


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७४५. वा | शनिवार | दि. २० एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# नौटंक्या करणाऱ्यांना निवडणुकीत साथ देऊ नका...

## धामणगावबढे येथील सभेत मंत्री गुलाबराव पाटलांचा खेडेकर-तुपकरांवर अप्रत्यक्ष निशाणा

### जे जे या निवडणुकीत चभरेपणा करतील त्यांना मतदाना नंतर इतके तडाखे देऊ की पुढच्या निवडणुकीत ते निवडणुकीचे नाव सुद्धा काढणार नाही असा गंभीर इशारा आ.संजय गायकवाड यांनी जाहीर सभेत दिला

**जनसंचलन/बुलढाणा**

लोकांसमोर स्वतःच्या गरिबीचे खोटे प्रदर्शन करून नौटंक्या करणाऱ्या उमेदवाराला लोकसभा निवडणुकीत साथ देऊ नका. देशाचा विकास साधणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान पदावर बसवण्यासाठी प्रतापराव जाधव यांना बहुमतांनी निवडून द्या, असे आव-ाहन राज्याचे मंत्री तथा शिवसेना नेते गुलाबराव पाटील यांनी केले. या माध्यमातून त्यांनी अप्रत्यक्षरित्या तुपकरांवर निशाणा साधला. खासदार प्रतापराव जाधव यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत गुलाबराव बोलत होते. या वेळी व्यासपीठावर बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड,भाजपा नेते विजयराज शिंदे यांच्यासह आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. आपल्या भाषणात बोलताना गुलाबरावांनी प्रतिस्पर्धी उमेदवार रविकांत तुपकर व प्रा. नरेंद्र खेडेकर यांच्यावर चांगलेच तोंडसुख घेतले. ते म्हणाले की, स्वतःला गरीब शेतकऱ्याचा मुलगा दाखवून लोकांकडून पैसे उकळणारा उमेदवार असो की, स्वतःला कारसेवक म्हणून भासवणारा व स्वतःची हिंदुत्ववादी छवी प्रदर्शित करणारा, अशा दोन्ही उमेदवारांवर जनतेने विश्वास ठेवण्याची गरज नाही. गेल्या दहा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताने प्रचंड प्रगती केली आहे. जगभरात भारताचा मान त्यांनी उंचावला आहे. देशात सबका साथ, सबका विकास या न्यायाने पंतप्रधान मोदी काम करीत आहेत. त्यामुळे अशा सशक्त हातांमध्ये पुन्हा एकदा देशाची सत्ता सोपवणे गरजेचे आहे. त्यामुळे कसल्याही भूलथापांना बळी पडू नका. भावनिक आवाहन करणाऱ्यांना थारा देऊ नका. गुलाबराव पुढे म्हणाले की, दिवसरात्र गरीबांची व जनतेची सेवा करणारा मुख्यमंत्री म्हणजे एकनाथ शिंदे आहेत. मला त्यांच्याबरोबर मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली, हे मी माझे भाग्य समजतो. मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनीही राज्याच्या विकासासाठी काम केलेले आहे. उपमुख्यमंत्री म्हणून अजितदादा पवार देखील या या दोघांना राज्यच्या विकासासाठी हातभार लावत आहेत. त्यामुळे जनतेने भाजप-शिवसेनेच्या उमेदवाराच्या पारड्यात मत टाकावे, जेणेकरून देशाच्या व राज्याच्या विकासाला चालना मिळेल.




**या प्रसंगी बोलताना आमदार संजय गायकवाड यांनी तुपकरांवर जोरदार तोंडसुख घेत-ले. ते म्हणाले की, तुपकर सांगतात की, मी लोकांच्या लोकवर्गणीच्या पैशांमधून आरामदायक गाडी विकत घेतली आहे. मग केवळ नंबर ९९९९ मिळवण्यासाठी खर्च केलेले ४ लाख रुपये कुठून आणले. आज स्वतःला गरीब शेतकऱ्याचा मुलगा म्हणायचे आणि दुसरीकडे लाखो रुपयांचे कपडे अंगावर चढवायचे. जनतेला सांगायचे की, मी जनतेसाठी झटतो, त्यामुळे मला माझ्या कुटुंबालाही भेटायला वेळ मिळत नाही. मग तुम्ही चार-चार वेळा कपडे बदलायला घरी जाता, तेंव्ह तुम्ही कुटुंबीयांची भेट घेत नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.**

# मतदान केंद्राजवळ वाटल्या भाजपच्या चिठ्ठ्या, भाजप-काँग्रेसचे कार्यकर्ते समोरासमोर, नागपुरातील घटना...

**वृत्तसंस्था/ नागपूर**

मतदान केंद्राजवळ लावण्यात आलेल्या राजकीय पक्षांच्या बुथवरून भाजपच्या चिठ्ठ्या वाटण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. येथे सुरुवातीला पोलिसांनी भाजपच्या बुथवरील प्रिंटर जप्त केला. त्यानंतर बराच गोंधळ झाल्यावर अखेर तो प्रिंटर परत करण्यात आला. ही घटना नागपूर लोकसभेतील मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघातील बांग्लादेश परिसरातील संत कबीरदास उच्च माध्यमिक शाळा या केंद्राजवळ घडली.मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी दुपारी १२च्या सुमारास या परिसरातील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भाजपच्या कार्यप्रणालीवर आक्षेप घेतला. मतदान केंद्राच्या परिसरात राजकीय पक्षांची बुथ लागतात. मतदारांचे मतदान केंद्रावरील नेमक्या कोणत्या खोलीत आहे यासाठी ते मतदारांना मदत करतात. ही मदत करताना राजकीय बुथवरून मतदारांना एक चिठ्ठी दिली जाते. यात सगळी माहिती असते. भाजपचे कार्यकर्ते ही माहिती देताना सोबत कहो दिल से, नितीन जी फिर सेफ असे लिहिलेली आणि नितीन गडकरी यांच्या छायाचित्रासह कमळाचेही चिन्ह असलेली चिठ्ठी देत असल्याचे समोर आले. काँग्रेसने यावर आक्षेप घेतला.काही काळासाठी दोन्ही पक्षांची कार्यकर्ते समोरासमोर आले. पोलिसांनी मध्यस्थी केली. भाजपची चूक असल्याचे सांगत पोलिसांनी त्यांचे प्रिंटर जप्त केले. यावरून भाजप कार्यकर्ते पोलिसांमध्ये चांगलीच बाचाबाची झाली. ही माहिती मिळताच आमदार प्रवीण दटके घटनास्थळी दाखल झाले. कार्यकर्त्यांकडून ही चूक परत होणार, अशी ग्वाही त्यांनी दिली. मात्र, प्रिंटर जप्त करण्याचे अधिकार पोलिसांना नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावर पोलिसांनी प्रिंटर परत केले. त्यानंतर वातावरण निवळले. ज्येष्ठ नागरिक आणि अपंगांना मतदानासाठी नेताना किमान त्यांच्यासाठी गाडी मतदान केंद्राच्या १०० मिटरच्या परिसरात येऊ द्यावी, अशी विनंती आमदार प्रवीण दटके यांनी सीपी ॲण्ड बेरार येथील मतदान केंद्रावर केली. मात्र, गुन्हे शाखेचे उपायुक्त निमीश गोयल ती अमान्य केली. मतदान



केंद्रांवर किमान चार व्हील चेअर उपलब्ध असव्यात असा नियम असूनही अनेक मतदान केंद्रांवर एकच व्हील चेअर होती. अशात गोयल गाडीसुद्धा मतदान केंद्राच्या दारापर्यंत जाऊ देत नाहीत हा अपंग व ज्येष्ठ नागरिकांवर अन्याय आहे,फ्असे मत दटके यांनी व्यक्त केले.

# निवडणुकीदरम्यान तीन दिवस मद्यविक्री बंद राहणार...

## आठवड्यात पाच दिवस ड्राय डे जाहिर...

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे. यासाठी दि. २४ ते २६ एप्रिल आणि त्याआधी दि. २१ एप्रिल रोजी भगवान महावीर जयंती आणि दि. २३ एप्रिल रोजी हनुमान जयंती असल्याने ड्राय डे जाहिर करण्यात आला आहे. त्यानुसार आठवड्यातील पाच दिवस जिल्ह्यातील सर्व अबकारी अनुज्ञाप्ती बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहे. तसेच सोमवार, दि. १३ मे २०२४ रोजी रावेर मतदारसंघासाठी मलकापूर आणि नांदुरा तालुक्यात मतदान होणार आहे. त्यासाठी दि. ११ ते १३ मे दरम्यान ड्राय डे जाहिर करण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीची मतमोजणी मंगळवार, दि. ४ जून २०२४ रोजी होणार आहे. या दिवशी मद्यविक्री बंद राहणार आहे. निवडणुका खुल्या, मुक्त, निर्भय, शांततेच्या वातावरणात, पार पाडण्याच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व अबकारी अनुज्ञप्ती नमुना सीएल-२, सीएल-३, एफएल-१, एफएल-२, एफएल-३, एफएल, बीआर-२ आदी बंद ठेवणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१च्या कलम १३५ (सी), तसेच मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ चे कलम १४२ (१) नुसार तसेच त्या अंतर्गत केलेल्या विविध नियमानुसार मतदानासाठी तीन दिवस आणि मतमोजणीच्या दिवशी कोरडा दिवस जाहिर केला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व अबकारी अनुज्ञप्ती बंद ठेवण्यात येतील. दि. २४ एप्रिल रोजी मतदानाची वेळ संपण्यापूर्वी ४८ तास अगोदर सायंकाळी ५ वाजल्यापासून संपूर्ण लोकसभा मतदारसंघ आणि मलकापूर, नांदुरा तालुक्यालगत पाच किलोमीटर परिसरातील सदर तालुक्यातील भाग येथे मद्य विक्री बंद राहिल. दि. २५ एप्रिल रोजी मतदानाच्या पूर्वीचा संपूर्ण दिवस आणि दि. २६ एप्रिल रोजी मतदानाच्या दिवशी संपूर्ण दिवस मद्यविक्री बंद राहिल. तसेच मतमोजणीच्या दिवशी दि. ४ जून रोजी संपूर्ण जिल्ह्यात मद्यविक्री बंद राहिल. बुलडाणा जिल्ह्यालगत रावेर, जालना, औरंगाबाद, मध्यप्रदेशातील बुऱ्हानपूर मतदारसंघासाठी दि. १३ मे रोजी मतदान



होणार आहे. त्यामुळे दि. ११ मे रोजी रावेर मतदारसंघात समाविष्ट मलकापूर आणि नांदुरा येथे सायंकाळी पाच वाजल्यापासून मद्यविक्री बंद राहिल. तसेच मतदानपूर्वीचा दिवस आणि मतदानाचा दिवस दि. १२ आणि दि. १३ मे रोजी जिल्ह्यातील रावेर मतदारसंघालगत ५ किलोमीटर परिसरात जिल्ह्यातील भागात मद्यविक्री बंद राहणार आहे. सदर आदेशाची जिल्ह्यातील सर्व संबंधित अबकारी अनुज्ञप्तीधारकांनी नोंद घ्यावी, अनुज्ञप्तीधारक या आदेशाची अंमलबजावणी करीत नसल्यास किंवा आदेशाचे उल्लंघन करीत असल्यास त्यांच्याविरुद्ध मुंबई दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ५४ (१) (सी) नुसार कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

# श्री महावीर जयंतीला कत्तलखाने, मांसविक्री बंद- जिल्हाधिकारी

जनसंचलन/बुलडाणा

जिल्ह्यात रविवार, दि. २१ एप्रिल रोजी श्री महावीर जयंती साजरी करण्यात येणार आहे. जयंतीनिमित्ताने कत्तलखाने आणि मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे. निर्बंधाच्या कालावधीत मांसविक्री होणार नाही, याची दक्षता देण्याचे निर्देशही देण्यात आले आहे. जैन धर्मियांच्या वतीने महावीर जयंती उत्सवानिमित्त रविवारी मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच दि. २३ एप्रिल २०२४ रोजी हनुमान जयंतीनिमित्त उत्सव मिरवणूक काढण्यात येणार आहे. सध्या विविध राजकीय पक्ष संघटनांकडून सुरु असलेली आंदोलने, मराठा आंदोलनाची पार्श्वभूमी, राज्यातील राजकीय घडामोडी व त्यांच्याकडून विविध मागण्या संदर्भात होणारे आंदोलने आणि जवळच्या काळात घडलेल्या जातीय घटना आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी, तसेच उत्सवाचा मागील इतिहास लक्षात घेता या उत्सव काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी दक्षता बाळगणे आणि खबरदारीच्या उपाययोजना अंमलात आणून चोख बंदोबस्त नेमणे आवश्यक असल्याने उत्सवाचे काळात दि. २१ एप्रिल २०२४ रोजी श्री महावीर जयंती निमित्ताने कत्तलखाने आणि मांसविक्री दुकाने बंद ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार दि. २१ एप्रिल २०२४ रोजी श्री महावीर जयंती उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी, यासाठी कत्तलखाने आणि मांस विक्री दुकाने बंद ठेवावीत, तसेच कोणत्याही परिस्थितीत मांसविक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे.

# मेरा अंत्रीखेडेकर रोडवर वर भीषण अपघात एक गंभीर जखमी

## सदर रोडच्या साईड पट्ट्या भरल्या नसल्यामुळे अपघात

जनसंचलन/चिखली

चिखली तालुक्यातील मौजे मेरा ते अंत्रीखेडेकर या रोडवर राहुल गजानन झिने वय वर्ष २९ राहणार बोरखेडी तालुका जाफराबाद जिल्हा जालना यांचा बोरखेडी वरून मेहकरला लग्नाला जात असताना अंत्रीखेडेकर ते मेरा या रोडवर भागवत अचितराव माळेकर यांच्या कोट्यासमोर मोठ्या टिप्पर गाडीने राहुल गजानन झिने याला मागून उडवले आहे यामध्ये राहुल गजानन झिने हे गंभीर जखमी झाले असता भागवत माळेकर व गावातील सुज्ञ व्यक्तींना यांनी अंत्रीखेडेकर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी चिखली येथे पाठवण्यात आले होते गाडीला ओव्हरटेक करताना जागा नसल्यामुळे सदर अपघात झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे अपघात झाला आहे त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत सदर अपघात यापूर्वी ठेकेदाराने काम केले होते त्यांनी या रोडच्या साईड पट्ट्या भरल्या नव्हत्या त्यांच्या विरोधात तक्रार केली होती त्याची सुद्धा शासकीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही या रोडवर यापूर्वी सुद्धा तीन ते चार जणांचा अपघातामध्ये मृत्यू झाला



आहे त्याला सुद्धा हे यापूर्वीचे काम करणारे ठेकेदार जबाबदार असल्याचे दिसून येत आहे ठेकेदार आणि शासकीय अधिकारी यांचे संघनमत व समीकरण झाले आहे काय किंवा या रोडवर आणखीन किती जणांचा जीव घेणार आहे अधिकारी यांना वेळोवेळी तक्रारी करून सुद्धा कोणत्याही प्रकारचे दखल या रस्त्याच्या बाबतीत आजपर्यंत घेण्यात आली नाही त्यामुळे अधिकारी वर्ग आणखी किती जणांचा या रोडवर जीव घेणार असे सर्वसामान्य लोकांना पडलेला प्रश्न आहे

# ४ देशी पिस्टल, १७ राऊंड जप्त एलसीबीची मोठी कारवाई...

## चौघांच्या एलसीबीने आवळल्या मुसक्या; मध्यप्रदेशातून जळगाव जामोदमध्ये आले होते आरोपी..

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने काल रात्री मोठी कारवाई केली आहे..मध्यप्रदेशातून जळगाव जामोद तालुक्यातील शस्त्रे विकणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात आले आहे त्यांच्या ताब्यातून ४ देशी पिस्टल १७ राऊंड एक मोटर सायकल तीन मोबाईल व ३२,३७० रोख असा एकूण २ लाख १३ हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे..जळगाव जामोद तालुक्यातील निमखेडी फाट्याजवळ ही कारवाई करण्यात आली..मध्यप्रदेशातील पाचोरी येथून काही व्यक्ती येणार असून



देशी बनावटीच्या पिस्टलची डील करणार असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली होती.. त्यावरून एलसीबी व सोनाळा पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली..भारसिंग मिसऱ्या खिराडेव, हिरचंद गुमानसिंग उचवारे, आकाश मुरलीधर मेश्राम, संदीप अंतराम डोंगरे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.अशी माहिती आज जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तीन दुचाकी चोरटे पोलिसांच्या जाळ्यात सात दुचाकी केल्या जप्त




जनसंचलन/मोताळा

दुचाकी चोरणाऱ्या तीन जणांना बोराखेडी पोलिसांनी ताब्यात घेत त्यांच्याकडून ३ लाख ९५ हजार रुपयांच्या ७ दुचाकी जप्त केल्या आहेत. ही कारवाई बोराखेडी पोलिसांनी १८ एप्रिल रोजी सकाळी केली. तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना २० एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. खरबडी येथील मोहसीन शाह यांची १७ एप्रिल रोजी खरबडी रोडवरून दुकानासमोरून एमएच-१४-एफजे-८६८३ क्रमांकाची दुचाकी चोरीस गेली होती. पोलिसांच्या एका पथकाने गोपनीय माहितीच्या आधारावर खरबडी रोडवरील अयान खान नूरहसन खान यास ताब्यात घेत त्याच्याकडून ही दुचाकी जप्त केली. नंबर प्लेट नसलेली आणखी एक दुचाकीही जप्त करण्यात आली आहे. त्याची कसून चौकशी केली असता, ती. मुझम्मिल शे. रफिक (रा. प्रभाग क्र. १६) आणि विश्वराज प्रकाश सुरडकर (रा. रिधोरा) जहागीर) या दोघांची नावे समोर आली. त्यांना ताब्यात घेत त्यांच्याकडूनही पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या. तिन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांची दोन दिवसांच्या पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

# आईचा हात,पत्नीची साथ,जनतेचा आशिर्वाद घेत फडणवीसांनी मतदानाचा हक्क बजावला!...

वृत्तसंस्था/नागपूर

महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यातलं मतदान आज पार पडतंय. नागपुरातही आज मतदान आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पत्नी आणि आईसमवेत मतदानाचा हक्क बजावला. फडणवीसांचा एक व्हिडीओ प्रचंड व्हायरल होतोय. फडणवीस आपल्या वृद्ध आईचा हात धरून मतदानकेंद्रात घेऊन जाताना दिसतायेत. फडणवीसांचा राजकारणातला सुसंस्कृतपणा नेहमीच महाराष्ट्राच्या राजकारणाने पाहिलाय, पण आज आईसोबतचं फडणवीसांचं संवेदनशील वर्तन पाहून एक मुलगा म्हणून राजकारणाच्या पलीकडचे देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राला पाहायला मिळाले. देवेंद्र फडणवीस सध्या प्रचंड व्यस्त आहेत. प्रचंड मोठ्या प्रमाणात त्यांच्या सभा आणि भेटीगाठींचं सत्र सुरु आहे. महायुतीची महाराष्ट्रातली संपूर्ण कमानच फडणीसांच्या खांद्यावर आहे त्यामुळे फडणवीसांची प्रचारसभा व्हावी अशी महायुतीतल्या प्रत्येक उमेदवाराची इच्छा आहे. फडणवीसांच्या १०० हुन



अधिक सभा होणार आहेत. या सर्व व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढूनही फडणवीस नागपूरला पोहोचले. त्यांनी मतदानकेंद्रात जाऊन मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांच्या सोबत त्यांच्या पत्नी अमृता फडणवीसही होत्या. पण सर्वांचं लक्ष वेधून घेतलं ते देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्यासोबत असलेल्या फडणवीसांच्या आई यांनी. राजकीय जीवनात काम करत असताना राजकीय नेत्यांना घर आणि कुटुंबासाठी वेळ द्यायला मिळत नाही अशी तक्रार अनेकदा कुटुंबियांकडून होत असते. परंतु फडणवीसांनी एक वेगळं उदाहरण घालून दिल्याचं बोललं जातंय. मतदानकेंद्रात जेव्हा देवेंद्र फडणवीसांच्या आई आल्या तेव्हा देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांनी त्यांचा हात धरला होता. आधार देत ते आईला मतदानकक्षापर्यंत घेऊन गेले. आईने मतदानाचा हक्क बजावला यातून फडणवीसांनी पक्षासाठीची निष्ठा आणि आईसोबतचं प्रेमळ नातं या दोन्ही गोष्टींचा एकत्रित दाखल दिला अशी चर्चा सर्वत्र आहे.

# बसमध्ये चढताना दागिने चोरी करणाऱ्या अल्पवयीन मुलीस खामगावात पकडले...

जनसंचलन/ खामगाव

बसस्थानकात बसमध्ये चढताना एका महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत तसेच तरुणीच्या पर्समधून ८ हजार रुपये लंपास केले. ही घटना खामगाव स्थानकावर बुधवारी घडली. याप्रकरणी पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे चोरी करणाऱ्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला पकडले. तक्रारीनुसार, सीमा गणेश कदम (२५, रा. वळती, ता. चिखली) यांच्या गळ्यातील दोन मंगळसूत्रांसह सोन्याची पोत (किंमत २८ हजार) लंपास करण्यात आली. काही वेळात ही घटना त्यांच्या लक्षात आली. तर त्याचवेळी माटरगाव येथील ज्योती महादेव राऊत ही तरुणी संभाजीनगर येथे जाण्यासाठी बसस्थानकात आली असता, तिच्या पर्समधील ८ हजार रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केल्याचे तक्रारीत नमूद केले. या दोन्ही घटनांची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी बसस्थानकातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासले. यामध्ये एक १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी चोरी करताना दिसून आली. त्यानंतर पोलिसांनी लगेच बसस्थानकातून चोरट्या मुलीला ताब्यात घेतले. चौकशीत पोलिसांनी तिच्या जवळून सीमा गणेश कदम यांची चोरलेली पोत जप्त केली. याप्रकरणी मुली विरोधात भादंवि कलम ३७९, ३९२ भादंवि नुसार गुन्हा दाखल केला. खामगाव बसस्थानकावर चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

# आपल्याकडे विकासाचे व्हिजन विजय आपलाच- संदीप शेळके

जनसंचलन/बुलडाणा

जनतेला विकास पाहिजे आणि आपण सुरुवातीपासूनच विकासाचे व्हिजन घेऊन लढतो आहे. त्यामुळे आपला विजय निश्चित असल्याचा दावा संदीप शेळके यांनी केला. अपक्ष उमेदवार तथा वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांचा जिल्हाभर झंझावाती प्रचार सुरु आहे. सामान्य जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद त्यांना मिळतोय. काल जामोद, संग्रामपूर, वरवट आणि सोनाळा येथे संदीप शेळके यांचा भव्य रोड शो संपन्न झाला. दरम्यान जनतेशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी पुढे बोलताना संदीप शेळके म्हणाले की, ही निवडणूक परिवर्तन घडवून आणणारी आहे. जिल्ह्याचे भवितव्य घडवणारी आहे. आजवर जिल्ह्याचा विकास केवळ खुंटला आहे. यंदा जनतेचा कौल विकासाच्या दिशेने आहे. आपण सुरुवातीपासूनच विकासाचे व्हिजन मांडत आहोत. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबध्द असल्यामुळे विजय आपलाच असल्याचा दावा शेळकेंनी केला. तरुणाईचा ओढा आपल्याकडे आहे, जिल्ह्यात एमआयडीसी तयार करून तरुणांना रोजगार देण्याचे आपले प्रथम प्राधान्य आहे. शेतकऱ्यांसाठी नदीजोड प्रकल्प, सिंचनाची टक्केवारी, शेतपांदण रस्ते,



शेतमालाला भाव मिळाला पाहिजे यासाठी आपण विशेष प्रयत्न करणार आहेत. बचत गटांच्या भगिनींसाठी ऑनलाइन बाजारपेठ खुली करण्याची आपली संकल्पना आहे. अश्या प्रकारे विविध बाबींवर आपण परिपूर्ण काम करण्यासाठी कटिबध्द आहोत. जनतेला विकास पाहिजे, आपला विजय निश्चितच आहे असे शेळके म्हणाले.

# क्रूझर व मोटरसायकलची धडक वरखेड बु. येथील तंटामुक्ती अध्यक्षपती ठार

जनसंचलन/ शेगाव




वरवटकडून शेगावकडे येत असताना समोरून येणाऱ्या क्रूझरने मोटरसायकलला धडक दिल्याने वरखेड बु. येथील तंटामुक्ती अध्यक्षपतीचा जागेवरच मृत्यू झाल्याची घटना १७ एप्रिल रोजी दुपारी ३.३० वाजता वरवट रोडवरील बुरुंगले पेट्रोल पंपासमोर घडली. याबाबत निवृत्ती वासुदेव हिंगणे वय ४२ वर्षे रा. वरखेड बु. ता. शेगाव यांनी पोलिसात फिर्याद दिली की, माझे मामा दिनकर शालीग्राम राउत राहणार वरखेड बु. ता. शेगाव हे संग्रामपुर तालुक्यातील चोंडी टाकलळेश्वर येथे नातेवाइकाच्या घरी नानमुखाच्या कार्यक्रमासाठी त्याच्या मोटारसायकल पॅशन प्रो. क्रं एम.एच. २८ ए. एम. ४९४७ ने व फिर्यादी हा त्याचे मोटारसायकल व्हिडीओ प्लॅटीना गाडी क्रं एम. एच. २८ बी.एफ. ५३२३ ने गेले होते. नानमूख कार्यक्रम आटोपल्यावर ते परतीच्या मार्गाला लागले शेगाव केवळ एक किलोमीटर अंतरावर असतानाच बुरुंगले पेट्रोल पंपासमोर समोरून भरधाव येणाऱ्या एम. एच. २० एफ. जी. ०१५४ या क्रमांकाच्या क्रूझरने जबरदस्त धडक दिली. त्यामुळे दिनकर शालिग्राम राऊत हे जागेवरच गतप्राण झाले. क्रूझर चालक विठ्ठल काकासाहेब इंगळे रा. शिरसगाव ता. भोकर जिल्हा जालना त्याचे ताब्यातील वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवुन दिनकर राऊत यांच्या मृत्यूस कारणीभुत ठरला आहे. व मोटार सायकल क्रं एम. एच. २८ ए. एम. ४९४७ चे हेडलाइट व इतर बरेच नुकसान केले आहे. अशा रिपोर्ट वरून क्रूझर चालकावर अप नं. २३१/२०२४ कलम ३०४ अ, २७९, ४२७ भादंवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेगाव - वरवट रोडवर वाहतुकीचे प्रमाण जास्त असून या मार्गावर रात्र दिवस वाहने भरधाव वेगाने धावतात. असे असतांना या रस्त्यावर मात्र कुठेही गतिरोधक दिसत नाही. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यापूर्वी भोनगाव येथील एका युवतीचा अपघात होऊन गतप्राण झाल्याची घटना ताजी असतांना पुन्हा वरखेड येथील इसमाचा अपघातात मृत्यू झाल्याने या मार्गावर गतिरोधक असणे किती गरजेचे आहे हे समजते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लीड द्या आणि पुन्हा आमदारकी मिळवा, जो लीड देणार नाही त्याचं तिकीट धोक्यात भाजपचे नवे धोरण



वृत्तसंस्था/मुंबई


लोकसभा निवडणुकीत महायुतीने विशेषतः भाजपने मिशन ४५ प्लस अत्यंत गांभीर्याने घेतल्याचं दिसतंय. त्यासाठी भाजपने आपल्या आमदारांना विशेष टार्गेट दिलंय.जो आमदार हे टार्गेट पूर्ण करणार नाही त्या आमदारांचे तिकीट धोक्यात येऊ शकतं. जो आमदार लोकसभेच्या उमेदवाराला लीड देईल त्याला पुन्हा तिकीट देण्यात येईल, आणि ज्याच्या मतदारसंघात लीड कमी मिळेल त्याचं आमदारकीचं तिकीट धोक्यात येणार आहे. त्यामुळे लोकसभेच्या उमेदवाराशी मतभेद असले तरी-ही स्वतःच्या विधानसभेसाठी आमदारांना काम करावं लागणार आहे.राज्यातील पहिल्या टप्प्यातील मतदानाला अवघे काही तास उरलेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राज्यात प्रचारसभा देखील सुरु झाल्यात. राज्यात मिशन ४५ पूर्ण करण्यासाठी एकीकडे हे दिग्गज नेते कामाला लागले असताना दुसरीकडे भाजपने आपल्या आमदारांना देखील त्यांच्या त्यांच्या मतदारसंघातून लीड देणं बंधनकारक केलं आहे. प्रत्येक आमदाराचं रिपोर्ट कार्ड तयार होणार सगळ्यात महत्वाचे म्हणजे भाजप नेत्यांनी विधानसभा आमदारांना नुसतं टार्गेटच दिलं नाही तर त्यानुसार प्रत्येकाचं रिपोर्ट कार्डच तयार केलं जाणार आहे. त्यांच्या मताधिक्याचा उमेदवाराला कसा फायदा झाला, याचं मूल्यमापन यावेळी केले जाणार आहे. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी विधानसभा आमदार आणि इच्छुक उमेदवारांना तशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे पुन्हा आमदारकीचं स्वप्न पाहायचं असेल, तर आतापासूनच जोमाने कामाला सुरुवात करावी लागणार आहे. आमदारकी हवी असेल तर परफॉर्मन्स दाखवा ज्याची कामगिरी चांगली त्याला तिकीट असं धोरण मागील काही निवडणुकामध्ये भाजपने राबविलेल्याचं दिसतंय. या लोकसभा निवडणुकीत देखील सुमार कामगिरी असणाऱ्या काही खासदारांचा पत्ता कट करण्यात आलाय. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा तिकीट मिळवायचे असेल तर लोकसभेत आपला परफॉर्मन्स आमदारांना दाखवावाच लागेल. त्यामुळे पक्षाने दिलेल्या लोकसभा उमेदवाराबाबत आमदारांचे कितीही मतभेद असेल तरी स्वतःच्या विधानसभेच्या उमेदवारीसाठी तरी आमदारांना काम करावे लागणार हे मात्र नक्की.राज्यातील ४८ पैकी ४० हून अधिक जागा जिंकण्याचे धोरण भाजपने आखलं असून त्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी भाजपने सुरुवातीला एकनाथ शिंदे आणि नंतर राष्ट्रवादीच्या अजित पवारांना सोबत घेतलं. आता राज ठाकरे यांनाही सोबत घेण्यात आलं आहे

# जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची मतदार प्रतिज्ञा मतदानासाठी नागरिकांना प्रोत्साहित करा- बी. एम. मोहन

जनसंचलन/बुलढाणा

लोकशाही केंद्रीत राजकीय व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी निष्पक्ष, भयमुक्त व शांततापूर्ण वातावरणात निवडणूक प्रक्रियेसाठी नैतिक मुल्याधारित मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदेंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या विविध विभागांतर्गतच्या मतदार जागरूकता मंचाच्या वतीने गुरूवारी (दि. १८) रोजी सामुदायिक मतदार प्रतिज्ञा घेण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपचे जिल्हा नोडल बी. एम. मोहन यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषदेच्या प्रांगणात सामुदायिक मतदार प्रतिज्ञा कार्यक्रम पार पडला. यावेळी महिला व बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले, जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय इंगळे, जिल्हा परिषदेच्या विविध कर्मचारी संवर्गाच्या संघटनांचे पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. नागरिकांना सशक्त मतदार म्हणून घडविण्यासाठी सहाय्यकारी ठरण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय विभाग व अधिनस्थ कार्यालयामधून ९६५ मतदार जागरूकता मंच स्थापना करण्यात आले आहे. भारतीय निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या सुनियोजित मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभाग या प्रमुख कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या मतदार जागरूकता मंचाची स्थापन करण्यात आली आहे. समाजातील सर्व घटकांमध्ये शासकीय व निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून निवडणूक साक्षरता व सहकार्यता निर्माण करण्यासाठी हा फोरम महत्वपूर्ण आहे. व्होटर अवेअरनेस फोरम ही निवडणूक प्रक्रियेच्या आधारावर चर्चा आणि जागरूकता व्यक्त करण्यासाठी साधनांचे व्यवस्थापन, मतदार नोंदणी आणि मतदान कसे, काय आणि कुठे करावे आदी बाबतीत वास्तव मार्गदर्शन व समुपदेशन सेवा उप-लब्ध करून देणारे महत्वपूर्ण माध्यम ठरू शकते, या विश्वासाने या फोरमचे कार्यान्वयन करण्यात आले आहे. दरम्यान गुरूवारी जिल्हा परिषदेंतर्गत असलेल्या विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांना दि. २६ एप्रिल रोजी होऊ घातलेल्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच त्यांच्या माध्यमातून ङ्गचला जाऊया मतदानालाफ्फ संदेश देण्यात आला. सर्व विभागप्रमुख व कर्मचारी यांनी मतदार जाणीव जागृतीसाठी सक्रियेतेने सहभागी होऊन लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लोकशाहीच्या या उत्सवात नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी उत्स्फूर्तपणे कार्य करावे, असे आव-हन जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन यांनी केले आहे.

# रात्रीस खेळ चाले,नवनीत राणांवर संजय राऊत यांची टीका...



वृत्तसंस्था/अमरावती

जे घाबरले ते पळाले, ते गद्दार झाले. पळपुटेपणा करणाऱ्यांचा कधीच इतिहास लिहला जात नाही. आम्ही गुजरात समोर झुकणार नाही, हा विकणारा महाराष्ट्र नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. कधीच हा महाराष्ट्र मोदी, शाहंपुढे गुडघे टेकणार नाही. ५६ इंचाची छाती महाराष्ट्रात नाही, तर लडाखमध्ये दाखवाफ्फ अशी टीका संजय राऊत यांनी केली. राज्याच्या मुख्यमंत्र्याला भेटीसाठी आठ-आठ दिवस वेटींगवर ठेवलं जातं. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री एवढा लाचार आहे, रोज उठतो आणि दिल्लीला जातो अशी टीका संजय राऊत यांनी केली. राज्यात मविआचे जागावाटप झालं आहे. अमरावती हे विदर्भाचे नाक आहे. अमरावतीची एक संस्कृती आहे. अमरावतीची प्रतिष्ठा पाच वर्षात महाराष्ट्र आणि दिल्लीत धुळीस मिळाली आहे. छाताडावर मोदी नावाचा जो राक्षक बसला आहे, त्याला खाली ओढण्यासाठी नवनीत राणाचा पराभव केला पाहिजे. मला लोक उगाच मनात नाहीत, सौ दाऊद एक राऊत अशी टीका संजय राऊत यांनी केली. भाजपने महाराष्ट्राला नामर्द केलंआम्ही कायदेशीर आणि बेकायदेशीर शस्त्र चालवतो म्हणून शिवसेना टिकून आहे. शिवसेनेने तीन मुख्यमंत्री दिले, पण दोन सोडून गेले पण एक शिवसैनिक जागेवर आहे. भाजपने महाराष्ट्राला नामर्द केलं. देशात हिंदू मुस्लिम दंगली केल्याफ्फ अशा शब्दात संजय राऊत यांनी प्रहार केला. विकासाचं पोरगं तुम्हाला झालं नाही, म्हणून तुम्ही दुसऱ्याचे नवरे करता. ती बाई तुम्हाला खुणावेल, ती पडद्यावरची नटी आहे. तुम्हाला बोल-विल पण तुम्ही जायचं नाही. आ-पला उमेदवार बलवंत वानखेडे आहे. रात्र वैऱ्याची आहे. रात्रीस खेळ चाले नवनीत राणांवर टीका करताना राऊत यांनी हे शब्द वापरले.त्या मंदीरात येऊन अमित शाहा खोटं बोलले ज्या बाईने मातोश्रीला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. मातोश्री विषयी अपशब्द वापरले, त्या बाईचा पराभव करणे हे शिवसैनिकांचे कर्तव्य समजून कामाला लागा. बाळासाहेब ठाकरे यांचा आदेश समजून ताकदीने कामाला लागा. मात-ोश्री हे आमचं मंदिर आहे. त्या मंदीरात येऊन अमित शाहा खोटं बोलले अशी टीका संजय राऊत यांनी केली.

# चिखलीत एकाची दोन लाखांची रोकड चोरट्यांनी पळवली

जनसंचलन/ चिखली

व्यावसायिक वाहन खरेदीसाठी उस-नवारी घेतलेली दोन लाखांची रक्कम चिखलीत एकाने भरदिवसा पळवल्याची घटना १६ एप्रिल रोजी चिखली शहरातील छत्रपती शिव-ाजी महाराज चौकात घडली. तालुक्यातील भानखेड येथील विठ्ठल रामदास इंगळे (४७) हे चिखली शहरातील एका गॅस एजन्सीमध्ये कामाला आहेत. ते ग्रामीण भागात सिलिंडर वाटपचे काम करतात. ज्या वाहनातून ते सिलिंडर वाटप करीत होते ते जुने झाल्याने नवीन वाहन त्यांना घ्यायचे होते. त्यासाठी डाऊन पेमेंट भरावे लागत असल्याने त्यांनी गावातीलच मित्राकडून दोन लाख रुपये उसने घेतले होते. १६ एप्रिल रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज चौकातील ज्यूस सेंटर येथे त्यांच्या मित्राने ठरल्या प्रमाणे ५०० रुपयांची चार बंडल असे एकूण दोन लाख रुपये आणून दिले असता विठ्ठल इंगळे यांनी ते पैसे आपल्या जवळील कापडाच्या पिशवीत बँकेच्या कागदपत्रासह ठेवले होते. थैली त्यांनी बाजूच्या खुर्चीवर ठेवली होती. तितक्यात त्यांच्या पाठीमागून दुचाकीवर दोन तरुण आले आणि क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी थैली घेत बसस्थानकाच्या दिशेने पळ काढला. इंगळे यांनी आरडाओरड केली व त्या दोघांचा शोधही घेतला. परंतु ते मिळून आले नाही. प्रकरणी विठ्ठल इंगळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक – जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958